माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/००००९९

अपिलार्थी श्री. राकेश नारायण गुरव

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सहकारी अधिकारी (के/पूर्व विभाग)
सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था पूर्व/पश्चिम उपनगरे, सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता	:	उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी	:	अनुपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
२५.१०.२०२४	०७.११.२०२४	१२.१२.२०२४	१०.१२.२०२५

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०७.११.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १०.१२.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २५.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "श्री. नारायण धोंडू गुरव यांच्या दि. ३०.०९.२०२४ रोजीच्या थकीत घरभाडे जोडल अर्जावरील केलेल्या कारवाईची माहिती व सदर अर्जाच्या अनुषंगाने विकासकावर सहकार कक्षाने केलेल्या अहवालाची माहिती.*

(२) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा, निर्मुलन व पुनर्वसन अधिनियम १९६१ मधील कलम ३ (ई) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक- १४५ मधील तरतुदीनुसार सदर योजनेतील सभासदांकडून सदनिका / गाळा हस्तांतरणाची परवानगी मिळण्या करीता एकूण आतपर्यंतच्या सर्व पारित झालेल्या झोपडीधारकांचे नावे, परवानगी पत्र आणि व सदनिका हस्तांरणासाठी जोडलेल्या कागदपत्रांची मूळ अर्जाची माहिती आणि संपूर्ण यादी द्यावी."

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.११.२०२४ रोजी अपिलार्थींना मुद्दा क्र. (१) बाबत कळविले की, आपण मागणी केलेल्या दि. ३०.०९.२०२४ रोजीच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

..२/-

मुद्दा क्र. (२) बाबत कळविले की, सदनिका हस्तांतरणाच्या पत्रामध्ये तसेच धारीकेमध्ये व्यक्तींचे आधार कार्ड, पॅनकार्ड तसेच आयकर रिटर्न व इतर वैयक्तीक माहितीचा समावेश असतो. तरी आपण मागणी केलेली माहिती ही त्रयस्त पक्षाची माहिती असल्याने तसेच सदर माहिती मागण्या मध्ये कोणतेही व्यापक जनहित असल्याचे सकृत दर्शनी दिसून येत नाही त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ८ (छ) नुसार व माहिती अधिकार २००५ चे कलम ११ अन्वये उपलब्ध करून देता येत नाही.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२.१२.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०२५ रोजी सकृतदर्शनी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने व व्यापक जनहित नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(छ) व कलम (११) अन्वये देता येणार नाही असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा, निर्मुलन व पुनर्वसन अधिनियम, १९६१ चे कलम ३(ई) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक- १४५ तरतुदीनुसार झालेली सदनिका हस्तांतरणाची संपूर्ण माहिती हवी आहे. त्यांनी नमुद केले की, ते ज्या संस्थेत राहतात त्या संस्थेकडे माहिती नसल्याने त्यांचे संस्थेत राहणारे लोक अधिकृत आहेत कि अनधिकृत आहेत हे समजण्यासाठी माहिती मागितली होती. जी की, त्यांना नाकारण्यात आलेली आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीचे लेखी निवेदन दि. १२.१०.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींना विहित मुदतीत उत्तर दिले की, मागितलेली सदनिका हस्तांतरण विषयी माहिती संबंधीतांची वैयक्तिक माहिती असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(छ) व कलम ११ नुसार देता येणार नाही. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

७. जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील क्र. ०२१८/२०२३, मध्ये दि. १८.०७.२०२३ रोजी दिलेले निकालाची प्रत सादर करुन नमुद केले की, अशाच प्रकारचे प्रकरणात राज्य माहिती आयोगाने विचारलेली माहिती खरेदी/ विक्रीची माहिती त्रयस्थ व्यक्तीस देणे योग्य नाही असे नमुद करुन अपील निकाली काढलेले आहे. त्यांनी नमुद केले की, जेव्हा त्यांच्या कार्यालयाकडून सदनिका हस्तांतरणाची परवानगी दिली जाते, त्याची एक प्रत संस्थेस देण्यात येते व अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती संकलित स्वरुपात उपलब्ध नाही.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भुमिका योग्य आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 15-10-2026

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६